# प्रत्येक हेतूसाठी वेळ



आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**
All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ऑप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी. वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — A Time For Every Purpose)

# प्रत्येक हेतूसाठी वेळ

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | वेळ जसा देव त्याकडे पाहतो | 1 |
| 2. | वेळ ओळखणे आणि वेळेचा सदुपयोग करणे | 7 |
| 3. | वेळेचा सदुपयोग करा | 16 |
| 4. | वेळ व ऋतू समजणे | 27 |
| 5. | वेळेचे पुनर्स्थापन | 34 |

# 1
# वेळ जसा देव त्याकडे पाहतो

**उपदेशक 3:1-8**

**1 सर्वांचा काही उचित काळ म्हणून असतो; भूतलावरील प्रत्येक कार्याला समय असतो:**

**2 जन्मसमय व मृत्युसमय; रोपण्याचा समय व रोपलेले उपटण्याचा समय असतो;**

**3 वधण्याचा समय व बरे करण्याचा समय; मोडून टाकण्याचा समय व बांधून काढण्याचा समय असतो;**

**4 रडण्याचा समय व हसण्याचा समय; शोक करण्याचा समय व नृत्य करण्याचा समय असतो;**

**5 धोंडे फेकून देण्याचा समय व धोंडे गोळा करण्याचा समय; आलिंगन देण्याचा समय व आलिंगन देण्याचे आवरून धरण्याचा समय असतो;**

**6 शोधण्याचा समय व गमावण्याचा समय; राखून ठेवण्याचा समय व टाकून देण्याचा समय असतो;**

**7 फाडून टाकण्याचा समय व शिवण्याचा समय; मौन धरण्याचा समय व बोलण्याचा समय असतो;**

**8 प्रेम करण्याचा समय व द्वेष करण्याचा समय; युद्ध करण्याचा समय व सख्य करण्याचा समय असतो.**

**उपदेशक 3:11**

**आपापल्या समयी होणारी हरएक वस्तू त्याने सुंदर बनवली आहे; त्याने मनुष्याच्या मनात अनंतकालाविषयीची कल्पना उत्पन्न केली आहे; तरी देवाचा आदिपासून अंतापर्यंतचा कार्यक्रम मनुष्याला उमगत नाही.**

**दानीएल 2:21**

**तोच प्रसंग व समय बदलतो; तो राजांना स्थानापन्न अथवा स्थानभ्रष्ट करितो; तो ज्ञान्यांस ज्ञान देतो व बुद्धिमानांस बुद्धी देतो.**

"किती वाजले?" हा एक वारंवार विचारण्यात येणारा प्रश्न आहे

जो आपल्या सर्वांना परिचित आहे. आजच्या वेगवान जगात, लोक घड्याळाच्या काट्याप्रमाणे धावताना दिसतात. खरे तर, आपल्यापैकी बहुतेक जण आपले जीवन घड्याळानुसार आयोजित करण्यास उत्सुक असतात. घड्याळाची—वेळेची आपल्या जीवनावर मजबूत पकड आहे असे दिसते. योग्य वेळी योग्य गोष्ट करणे, योग्य वेळी योग्य ठिकाणी असणे, योग्य वेळी योग्य गोष्ट बोलणे—या सर्वांचा आपल्यासाठी खूप अर्थ आहे. त्याचबरोबर, वेळेची "बचत" करण्याचे मार्ग आणि साधन शोधण्याचे बरेच प्रयत्न केले जात आहेत.

देवाचे घड्याळ जगाच्या स्थापनेपासून किंवा कदाचित अनंतकाळापासून—अज्ञात काळापासून वर्तमान समयापर्यंत टिक टिक करीत राहिलेले आहे या वस्तुस्थितीचा विचार करणे तुम्ही कधी थांबवले आहे का? तुम्हाला माहीत आहे का की देवाकडे आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यासाठी एक घड्याळ आहे? तुमच्या मनगटावरील घड्याळाप्रमाणे किंवा भिंतीवरील घड्याळानुसारच नव्हे तर देवाच्या घड्याळानुसार तुमचे जीवन व्यवस्थित करण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे किंवा इच्छाही केली आहे का? तुमच्यासाठी हे किती महत्त्वाचे आहे की तुम्ही देवाच्या वेळेनुसार गोष्टी करता आणि तुमच्या आयुष्यातील कोणत्याही वेळी तुम्ही जे करावे असे त्याला वाटते ते तुम्ही करीत आहात? आणि, तुमच्या आयुष्यासाठी नेमलेल्या वेळेनुसार तुम्ही जे बनावे असे त्याला वाटते आहे ते बनणे तुमच्यासाठी किती महत्त्वाचे आहे?

हे आव्हानात्मक प्रश्न आहेत, आणि हे खरोखर महत्वाचे आहे की आपण देवाचे घड्याळ जाणून घ्यावयास आणि त्यानुसार आपल्या जीवनाचा क्रम लावावयास शिकणे महत्वाचे आहे. हे पुस्तक व्यक्ती म्हणून आमच्यासाठी देवाची वेळ ओळखण्यात आणि समजण्यात आपली मदत करील.

# देवाचे घड्याळ

**प्रेषितांची कृत्ये 1:6,7**

**6 मग ते एकत्र असताना त्यांनी त्याला विचारले, “प्रभूजी, ह्याच काळात आपण इस्राएलाचे राज्य पुन्हा स्थापित करणार काय?”**

**7 तो त्यांना म्हणाला, “जे काळ** (ग्रीक *क्रोनोस*) **व समय** (ग्रीक *कैरोस*) **पित्याने स्वतःच्या अधिकारात ठेवले आहेत ते जाणणे तुमच्याकडे नाही.**

देवाजवळ एक वेळापत्रक, निश्चित क्रम आणि वेळ आहे, त्यात तो अशा घटना प्रगट करतो ज्या त्याने योजिलेल्या आहेत. तो त्याच्या समयानुसार कार्य करतो. तो बोलतो आणि मग त्याचे वचन वेळेवर पूर्ण करतो. जे शब्द देव बोलतो ते *“यथाकाली पूर्ण होतील”* (लूक 1:20). काही गोष्टी अशा आहेत ज्या देव बोलला आहे ज्या *“गुप्त ठेवून मुद्रित केल्या आहेत”* (दानीएल 12:9). देवाच्या “घड्याळात” “काळाची पूर्णता” अथवा “यथाकाळ” आहे. हा अत्यंत उपयुक्त, योग्य, आणि उचित समयाचा उल्लेख करतो—अशी वेळ जेव्हा तो परिपक्व होतो—योग्य वेळ. उदाहरणार्थ, जरी एदेन बागेचा करार, जो तारणाऱ्याच्या आगमनाचे अभिवचन देत होता, उत्पत्तीच्या तिसऱ्या अध्यायात करण्यात आला, तरीही हजारो वर्षापर्यंत पूर्ण झाला नाही जेव्हा येशूने इतिहासात पाऊल ठेविले. इतका काळ वाट का पाहावी लागली? बायबल स्पष्ट करते, *“काळाची पूर्णता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठविले”* (गलतीकरांस पत्र 4:4). *'कैरोस'* क्षणी—अतिशय योग्य वेळी, इतिहासात उचित समयी—प्रभू येशूने या जगात पाऊल टाकले. देवाचा सनातन हेतू सुद्धा तसाच पूर्ण होईल. *“ख्रिस्ताच्या ठायी पूर्वी केलेल्या योजनेप्रमाणे त्याने स्वतःच्या इच्छेनुरूप स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळवले; ती योजना अशी की, कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना स्वर्गात व पृथ्वीवर जे आहे ते सर्व ख्रिस्तामध्ये एकत्र करावे”* (इफिसकरांस पत्र 1:9,10). देवाने *“असा एक दिवस नेमला आहे की, ज्या दिवशी तो आपण नेमलेल्या मनुष्याच्या द्वारे जगाचा न्यायनिवाडा नीतिमत्त्वाने करणार आहे”* (प्रेषितांची कृत्यें 17:31).

म्हणून, आपण पाहतो की देवाजवळ एक वेळ आहे ज्यात तो घटनांमध्ये हस्तक्षेप करतो, आणि आपल्या सार्वभौमतेनुसार जे काही त्याने आधीच ठरविले आहे ते पूर्ण करतो. पृथ्वीपासून त्याच्या गमनाच्या (स्वर्गारोहणाच्या) पूर्वी शिष्यांनी प्रभूला त्या समयाविषयी विचारले ज्यात इस्राएलास पुन्हा सत्ता प्राप्त होणार होती आणि त्यास रोमी साम्राज्याच्या प्रभूत्वापासून मुक्त करण्यात येणार होते (प्रेषितांची कृत्यें 1:6,7). प्रभूचे उत्तर आम्हाला शिकविते की पित्याच्या स्वतःच्या अधिकारात वेळ आणि ऋतू आहेत. येशू *'क्रोनोस'* आणि *'कैरोस'* वेळेविषयी बोलला. हे ग्रीक शब्द *'क्रोनोस'* कालावधी, समयाचा विस्तार अथवा प्रमाण या विषयी बोलतो, तर *'कैरोस'* समयाच्या गुणवत्तेचा अथवा प्रकाराचा उल्लेख करतो. *'क्रोनोसचा'* उपयोग काळाची मोजमाप म्हणून केल्या जातो, जसे कालावधी—वेळेचा व्याप. *'कैरोसचा'* उपयोग विशिष्ट घटना, योग्य क्षण, महत्वाच्या घटना, आणि समयातील बदल यांच्या संदर्भात केला जातो. तो "काळाच्या पूर्णतेचा" उल्लेख करतो—वर्तमान समयासाठी कोणती घटना योग्य आहे.

काही विशिष्ट वेळा आणि ऋतू किंवा समय आहेत जे पित्याने गुप्त ठेवण्यासाठी आणि "त्याच्या सामर्थ्यात" निवडले आहेत. बायबल आपल्याला शिकवते की "गुप्त गोष्टी आपला देव परमेश्वर ह्याच्या स्वाधीन आहेत, पण प्रकट केलेल्या गोष्टी आपल्या व आपल्या वंशजांच्या निरंतरच्या आहेत" (अनुवाद 29:29). दुस-या आगमनाविषयी आणि युगाच्या समाप्तीबद्दल, येशू म्हणाला, "आणखी त्या दिवसाविषयी व त्या घटकेविषयी कोणाला ठाऊक नाही, स्वर्गातील देवदूतांनाही नाही, पुत्रालाही नाही, केवळ पित्याला ठाऊक आहे. सावध असा, जागृत राहा व प्रार्थना करा; कारण तो समय केव्हा येईल हे तुम्हांला ठाऊक नाही" (मार्क 13:32,33). तथापि, याचा अर्थ असा नाही की देव प्रकट करू इच्छित असलेले *'क्रोनोस'* आणि *'कैरोस'* आपण ओळखू शकत नाही. संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये, आपण पाहू शकतो की देव त्याच्या लोकांकडून अपेक्षा करतो की ते वैयक्तिक आणि एक समुदाय म्हणून

ते कोणत्या काळात आणि ऋतूंमध्ये राहतात हे त्यांनी जाणावे. देव अपेक्षा करतो की त्याच्या घड्याळात किती वाजले आहेत हे त्याच्या लोकांनी जाणावे.

## बायबलमध्ये "वेळ"

वेळेविषयीचा बायबलच्या दृष्टीकोणावरील आपल्या टिप्पणात मर्सर डिक्शनरी ऑफ द बायबल, 1990 सायमन जे. डेव्हरिज म्हणतात, "वेळेच्या हिब्रू कल्पनेविषयी महत्वाची गोष्ट ही आहे की त्यांची ही अपेक्षा असे की प्रत्येक नवीन दिवस इतर सर्व दिवसांपेक्षा गुणात्मकदृष्ट्या वेगळा असावा, शक्यतः अद्वितीय, पुनरावृत्ती न होणारी घटना त्यात घडून यावी ज्यात देव विशेष आणि निर्णायक पद्धतीने स्वतःचे ईश्वरत्व प्रगट करील. म्हणून, बायबलने त्यांच्या अत्यंत उल्लेखनीय घटनेच्या संदर्भात दिवसांविषयी बोलण्याची विशिष्ट पद्धत तयार केली." तो पुढे म्हणतो की बायबलच्या लोकांचा "असा विश्वास होता की त्यांचा देव त्यांना कोठेही आणि कोणत्याही क्षणी भेटू शकतो; सर्व जागा आणि सर्व इतिहास देवाचे क्षेत्र आहे. म्हणून, बायबलजवळ हेतू आणि क्रम, ध्येय, प्रक्रिया, भवितव्य यांचा एक बोध आहे."

वेळ हे बायबलमध्ये एक महत्वाचे तत्व आहे जेथे वेगवेगळ्या प्रकारच्या समयाविषयी संदर्भ आहेत–वेगवेगळ्या *'कैरोस'* क्षणांविषयी. स्तोत्र अशा वेळेविषयी बोलते जेव्हा देव मिळू शकतो (स्तोत्रसंहिता 32:6), वाईट समयाविषयी (स्तोत्रसंहिता 37:18,19), त्रासाच्या समयाविषयी (स्तोत्रसंहिता 41:1), आणि प्रसन्नतेच्या समयाविषयी (स्तोत्रसंहिता 69:13; 2 करिंथ 6:2). नव्या करारात आपणास हे शिकावयास मिळते की त्यांच्या सीमा ठरविण्याव्यतिरिक्त स्वतः देव राष्ट्रांच्या उदयाची आणि पतनाची वेळ ठरवितो (प्रेषितांची कृत्यें 17:26,27). ज्या काळात आपण जगत आहोत त्याचा उल्लेख *"पुढील काळ"* (1 तीमथ्य 4:1) आणि *"शेवटला काळ"*

(2 तीमथ्य 3:1) म्हणून करण्यात आलेला आहे. *“काळ व समय”* (1 थिस्सल 5:1), *“काळाच्या शेवटी”* (1 पेत्र 1:20), *“प्राचीन काळी,” “काळाच्या शेवटी”* (इब्री 1:1) आणि *“ऐन वेळी”* (इब्री 4:16) या सारखे वाक्यप्रयोगही आढळतात. वेळेवरील बायबलचा दृष्टीकोण समजणे हा म्हणूनच यशस्वी ख्रिस्ती जीवनाचे अविभाज्य अंग आहे.

## *'कैरोस'* समजणे

*'कैरोस'* ही केवळ ठरविलेली वेळ, सुयोग्य वेळ, अथवा योग्य वेळ आहे. सामान्यतः बोलावयाचे झाल्यास, *‘कैरोस'* कॅलेंडर वर्षांच्या संख्येशी निगडीत नाही. जर देवाने विशिष्टरित्या एक विशिष्ट कालावधी सांगितला नसेल, तर *'कैरोस'* क्षण हा विशिष्ट परिस्थितींच्या एकत्र येण्यावर अवलंबून आहे—परिस्थिती, स्थिती, लोक, वस्तू, इत्यादी—ज्याद्वारे देव जे बोलला आहे त्याच्या पूर्णतेची योग्य वेळ घडून येते.

उदाहरणार्थ, वैय्यक्तिक भविष्यवाणीची पूर्णता *‘कैरोस'* क्षणी घडून येते. जर एखाद्या विशिष्ट व्यक्तीला भविष्यवाणीचे वचन मिळाले असेल की त्याला व्यापारात यश लाभेल, तर याचा अर्थ असा नाही की त्याचे यश रात्रभरात घडून येईल. या भविष्यवाणीची परिपूर्णता तेव्हा घडून येईल जेव्हा देव शोधत असलेल्या निश्चित परिस्थिती त्या व्यक्तीच्या जीवनात घडून येतील. भविष्यवाणीचे वचन प्राप्त झालेला व्यक्ती जर तरुण असेल, तर शक्यतः देवाची अपेक्षा ही असेल की या व्यक्तीने विशिष्ट प्रशिक्षण घ्यावे आणि काही वर्षे काम करावे, नंतरच तो स्वतःचा व्यवसाय सुरू करावयास योग्य ठरेल. हा तरुण व्यक्ती आपला कारभार सुरू करतो त्यानंतर, कित्येक वर्षे निघून जातील आणि नंतर त्याला अशी कल्पना प्राप्त होईल ज्यामुळे तो अत्यंत यशस्वी होईल. भविष्यवाणीचे वचन जरी या सर्व दिवसांत खरे होते, तरीही ते केवळ तेव्हा पूर्णत्वास आलेले असेल जेव्हा या सर्व परिस्थिती घडून आलेल्या असतील आणि *'कैरोस'* क्षण आलेला असेल.

# 2
# वेळ ओळखणे आणि वेळेचा सदुपयोग करणे

**इफिसकरांस पत्र 5:15-17**
**15 म्हणून अज्ञान्यांसारखे नव्हे तर ज्ञान्यांसारखे सभोवार नजर ठेवून जपून चाला.**
**16 वेळेचा सदुपयोग करा, कारण दिवस वाईट आहेत.**
**17 म्हणून तुम्ही मूर्खांसारखे होऊ नका, तर प्रभूची इच्छा काय आहे हे समजून घ्या.**

**कलस्सै 4:5**
**बाहेरच्या लोकांबरोबर सुज्ञतेने वागा; संधी साधून घ्या.**

पवित्रशास्त्र आम्हाला शिकविते की आम्ही वेळेचा *(कैरोस)* सदुपयोग करावा. *"वेळेचा सदुपयोग करा"* हे वचन आमच्या जीवनातील योग्य संधी ओळखून तिचा उपयोग करण्यास सक्षम असण्याचा उल्लेख करते. वरील वचनाच्या संदर्भावरून, हे केवळ तेव्हा शक्य आहे जेव्हा आपण बुद्धिमान बनू व प्रभूच्या इच्छेचा समज बाळगून सावधपणे वागू, दुसऱ्या शब्दात, आमच्या जीवनातील योग्य संधीचा उपयोग करण्याची पात्रता—योग्य वेळी योग्य काम करणे—आमच्या व्यक्तिगत जीवनासाठी देवाच्या इच्छेच्या आमच्या समजावर अवलंबून आहे. देव आमच्या व्यक्तिगत जीवनासाठी *'क्रोनोस'* आणि *'कैरोस'* वेळ नेमितो. आमच्यापैकी प्रत्येकास *'क्रोनोस'* किंवा काही काळाचे आयुष्य जगावयाचे आहे. देवाने आपल्या लोकांस अभिवचन दिले, *"मी तुला भरपूर आयुष्य देईन"* (निर्गम 23:26). देवाची सामान्य इच्छा प्रगट करते की *"आमचे आयुष्य सत्तर वर्षे"* आहे आणि ते ऐंशी वर्षेपर्यंत वाढू शकते ( स्तोत्रसंहिता 90:10). देवाने आम्हाला *"दीर्घायुष्य"* (स्तोत्रसंहिता

91:6) देऊन संतुष्ट करण्याचे अभिवचन दिले आहे. एकंदर, देवाच्या मुलास *"हंगामाच्या वेळी, धान्याची सुळी आणून ठेवितात, तसा पुऱ्या वयाचा होऊन कबरेत जाशील"* असा विशेषाधिकार लाभलेला आहे (ईयोब 5:26). आणखी विशिष्टरित्या सांगावयाचे झाल्यास, आमच्या वैय्यक्तिक जीवनांसाठी देवाजवळ समय व ऋतु आहेत.

हे निश्चित समय ऋतू, आमच्या जीवनाचे *'कैरोस'* क्षण आम्ही ओळखले पाहिजेत आणि त्यांचा सदुपयोग केला पाहिजे. आम्हाला या संधीचा उपयोग करण्याची गरज आहे.

या वेळी आपल्या आयुष्याची *'कैरोस'* वेळ काय आहे? आपण जीवनाच्या कोणत्या ऋतूमध्ये आहात? ही कार्य करण्याची किंवा तयारीची वेळ आहे का? ही शिकविण्याची किंवा शिकण्याची वेळ आहे का? ही वेळ आहे का की आपण ख्रिस्ती जीवनाच्या विशिष्ट पैलूविषयी शिकावे? आपण विशिष्ट नाते स्थापन करावे अशी ही वेळ आहे का? आपण पुढील दिवसांसाठी विश्रांती घेऊन योजना आखावी अशी वेळ आहे का? आपण थांबून शीघ्र आध्यात्मिक वाढीच्या अलीकडील घटनांचे दृढीकरण करण्याची ही वेळ आहे का? आपण एखाद्या विशिष्ट विषयाचे संशोधन करावे आणि अभ्यास करावा अशी वेळ आहे का? आपण सेवा करावी अथवा नेतृत्व करावे अशी वेळ आहे का? आम्ही जीवनाच्या ज्या विशिष्ट ऋतूमध्ये आहोत त्यास जेव्हा आपण ओळखू शकू, तेव्हा आपण हा विशिष्ट हेतू पूर्ण करण्यासाठी आपल्या वेळेचा सदुपयोग करण्यास समर्थ ठरू.

एकदा जेव्हा प्रभू येशू यरुशलेम शहराजवळ गेला, तेव्हा त्याने ते शहर पाहिले व त्यासाठी तो रडला. यरुशलेमेच्या येणाऱ्या विनाशाची घोषणा करीत तो म्हणाला, *"... कारण तुझ्यावर कृपादृष्टी केल्याचा समय तू ओळखला नाहीस"* (लूक 19:41-44). देवाने यरुशलेमेसाठी *"कृपादृष्टी केल्याचा समय"* ठरविला होता, पण त्या शहरातील

लोकांस त्याची जाणीव नव्हती. माझा विश्वास आहे की देवाने आमच्या वैय्यक्तिक जीवनांसाठी विशिष्ट भेटीचा समय ठरविला आहे. आमच्या आयुष्याच्या या ऋतूंमध्ये, देव आमच्या अंतःकरणात एक विशिष्ट कार्य करतो, कदाचित आमच्या जीवनांसाठी योजना आणि हेतू सविस्तर प्रगट करतो, किंवा आम्हाला विशिष्ट दिशा देतो, आमच्याठायी विशिष्ट कृपादान देतो आणि मुक्त करतो. पण कृपादृष्टीच्या या समयामध्ये जे काही घडून येते ते मोठ्या प्रमाणात आमच्या प्रतिसादावर अवलंबून आहे. जर आम्ही आपल्या कृपादृष्टीच्या समयाविषयी अज्ञान असलो, तर देव आम्हास सोडून पुढे निघून जाईल. आपण देवाकडे लक्ष देत आहा का आणि सद्यपरिस्थितीत आपल्या जीवनात तो जे काही प्रगट करीत आहे त्याबाबत आपण संवेदनशील आहात का? तो जे काही करीत आहे त्यास आपण कसा प्रतिसाद देत आहात?

## वेळेच्या आत आणि पावलात पाऊल टाकून

**उपदेशक 3:17आ**
**... कारण हरएक गोष्टीचा व हर एक कामाचा नेमलेला समय आहे.**

**उपदेशक 8:6अ**
**प्रत्येक गोष्टीला नेमलेला काळ व न्यायसमय असतो ...**

आम्हास हे समजण्याची गरज आहे की प्रत्येक हेतूसाठी योग्य समय आहे. हे जाणणे महत्वाचे आहे की एखाद्या परिस्थितीसंबंधाने आम्ही काय करावे असे देवास वाटते, परंतु तितकेच महत्वाचे योग्य वेळी ते काम पार पाडणे आहे. बरेचदा, आम्हाला देवाकडून विचार, योजना, कार्यनीति, अथवा दृष्टांत प्राप्त होतो, आणि तो लगेच पूर्ण व्हावा हे आम्ही पाहू इच्छितो अथवा आपण जाऊन ते लगेच पूर्ण करीत इच्छितो. मी कठोर अनुभवाद्वारे शिकलो आहे की देवाजवळ योजना तर आहे, पण ती योजना प्रगट व्हावी आणि पूर्व व्हावी म्हणून त्याच्याण जवळ विशिष्ट वेळ सुद्धा आहे. ही आमची जबाबदारी आहे की आम्ही केवळ त्याच्या योजना आणि हेतूच जाणून घेता कामा नये, तर त्यांच्या

परिपूर्णतेसाठी त्याची वेळ सुद्धा समजून घ्यावी. आम्हास देवाच्या पावलात पाऊल टाकून आणि त्याच्या वेळेत चालले पाहिजे—पुढेही जाता कामा नये, आणि मागेही राहता कामा नये.

राजा दाविदाच्या जीवनातील दोन घटना आम्ही या ठिकाणी जी चर्चा करीत आहोत ती स्पष्ट करण्यात मदत करतात. देवाने दाविदास इस्राएलावर राजा म्हणून नेमण्याचे ठरविले होते. दावीद तरुण मुलगा असतांना त्याचा शमुवेल संदेष्ट्याने अभिषेक केला होता—तेल्याभंग हे दर्शविण्यासाठी की देवाने दाविदास राजा होण्यासाठी निवडले होते. दाविदाने गल्याथावर विजय मिळविल्यानंतर आणि त्या राष्ट्राचा 'हीरो' बनल्यानंतर, त्याला आपला जीव वाचविण्यासाठी राजा शौलापासून पळ काढावा लागला. रानटी पशूसारखा दाविदाचा पाठलाग करण्यात आला; तो भटक्यासारखा जीवन जगत राहिला, गुहेत लपून राहू लागला. वर्षे निघून गेली, पण दावीद या सर्व काळात त्याच्या देवास विश्वासू राहिला. सरतेशेवटी, राजा शौल लढाईत मारला गेला. जेव्हा दाविदाने हे ऐकले, तेव्हा त्याला शौलासाठी आणि त्याच्या घराण्यासाठी पश्चाताप झाला. या नंतर, *"दाविदाने परमेश्वराला प्रश्न विचारला की, मी यहूदाच्या एखाद्या नगरात जाऊ काय?" परमेश्वराने म्हटले, "जा." दाविदाने विचारले, "कोणीकडे जाऊ?" त्याने म्हटले, "हेब्रोनास जा." मग दावीद इज्रेलीण अहीनवाम आणि नाबालाची स्त्री कर्मेलीण अबीगईल ह्या आपल्या दोन्ही स्त्रियांसह तेथे गेला. तसेच दाविदाबरोबर जे पुरुष होते त्या सर्वांना आपापल्या कुटुंबांसह त्याने बरोबर नेले, व ते हेब्रोनाच्या गावात जाऊन राहिले. यहूदी लोकांनी तेथे जाऊन दाविदाला अभिषेक करून यहूदाच्या वंशाचा राजा नेमले. दाविदाला त्यांनी सांगितले की, "शौलाला ज्यांनी मूठमाती दिली ते याबेश-गिलादाचे लोक होत"* (2 शमुवेल 2:1-4).

योग्य वेळी, योग्य पाऊल उचलल्याने, दाविदास यहूदाचा राजा म्हणून ओळखले जाऊ लागले. लवकरच त्याला संपूर्ण इस्राएलावर

राजा म्हणून मान्य केले गेले. आपण पाहतो की दावीद असा व्यक्ती होता जो देवाच्या पावलावर पाऊल टाकून आणि त्याच्या वेळेनुसार चालू इच्छित होता. जरीही त्याला सिंहासन देण्याचे ठरविण्यात आले होते, तरीही तेथे पोहोचण्यासाठी त्याने घाई केली नाही किंवा उतावळा होऊन त्याने त्यासाठी प्रयत्न केले नाहीत. त्याने आपल्या वेळेत त्याच्या योजना प्रगट केल्या. तसेच, दावीद एका वेळी देवासोबत एक पाऊल टाकावयास शिकला. लक्षात घ्या की हेब्रोनास स्थलांतर करण्याबाबत तो किती सावध होता. पण जेव्हा त्याने योग्य वेळी योग्य पाऊल उचलले, तेव्हा सर्वकाही त्याच्या पक्षाने घडू लागले. योग्य वेळी योग्य पाऊल उचलणे आपल्या जीवनासाठी देवाच्या योजना आणि हेतूंची परिपूर्णता पाहण्याची आपणास संधी देईल.

दाविदाच्या जीवनातील दुसरी घटना दुःखद आहे, कारण ती हे दाखविते की दावीद देवाच्या पावलात पाऊल टाकून आणि त्याच्या वेळेत चालण्यात विफल ठरला आणि ही वेळ चुकल्याचे गंभीर परिणाम घडून आले.

**2 शमुवेल 11:1,2**

**1 राजे लोक युद्धांच्या मोहिमेस जातात त्या वेळी म्हणजे वर्षारंभी दाविदाने यवाबाला व त्याच्याबरोबर त्याच्या नोकरचाकरांना व सर्व इस्राएल लोकांना पाठवले; त्यांनी अम्मोन्यांचा संहार करून राब्बा नगरास वेढा घातला; पण दावीद यरुशलेमेतच राहिला.**
**2 संध्याकाळच्या वेळी दावीद पलंगावरून उठून राज-मंदिराच्या गच्चीवर जाऊन फिरू लागला; तेव्हा एक स्त्री स्नान करताना त्याने तेथून पाहिली; ती स्त्री दिसायला फार सुंदर होती.**

ही वर्षाची अशी वेळ होती जेव्हा राजे आपल्या पुरुषांसोबत युद्धावर जात. तथापि, दाविदाने आपल्या माणसांना युद्धावर पाठविण्याचे ठरविले आणि तो स्वतः आपल्या राजवाड्यात राहिला. तो चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी होता. त्याने सुंदर बथशेबाला पाहिले आणि तिच्याशी व्यभिचार केला. या कृत्यांमुळे त्याला अत्यंत दुःख

आणि वेदना झाल्या. या अपयशाचे कारण एका साधारण तथ्याकडे जाते की दाविदाने जेव्हा आपल्या माणसांसोबत युद्धावर जावयास हवे होते, तेव्हा तो गेला नाही. त्याने असा निर्णय घेतला ज्यामुळे तो चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी राहिला.

चार शुभवर्तमानांत लिहिण्यात आल्याप्रमाणे, येशूने आपल्या जीवनाची जशी व्यवस्था लावली त्याकडे पाहता, आपण पाहतो की त्याच्या जीवनासाठी तो पित्याच्या वेळेस संवेदनशील होता आणि त्याला त्याची पूर्णपणे जाणीव होती. येशू त्याच्या सेवेची सुरूवात करण्यासाठी 30 वर्षे वाट का पाहत राहिला याचे मुख्य कारण हे होते कारण त्याला माहीत होते की त्याची वेळ अद्याप आली नाही—त्याच्या पित्याने ठरविलेल्या त्याच्या सेवेत पाऊल टाकण्याची घटका अद्याप आलेली नव्हती (योहान 2:4). येशूने यशया 61 मधून ती सामर्थी वचने वाचून आपल्या सेवेची सुरूवात केली. तो भविष्यात्मक परिच्छेद वाचून, येशूने आपल्या श्रोतांसमोर घोषणा केली, *"हा शास्त्रलेख आज तुम्ही ऐकत असतांना पूर्ण झाला आहे"* (लूक 4:21). आपल्या सेवेची सुरूवात करण्यासाठी देवाच्या वेळेची येशूला जाणीव होती. त्याचा संदेश समयानुसार होता—समयोचित बोल. तो असे म्हणत पश्चातापाचा प्रचार करीत आला *"काळाची पूर्णता झालेली आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे; पश्चाताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा"* (मार्क 1:15). तो एका नव्या युगाची घोषणा करीत होता आणि त्याच्या संदेशाने लोकांचे लक्ष त्यावेळी देव पृथ्वीवर जे करीत होता त्याकडे आकर्षित केले. तो असा काही प्रचार करीत होता आणि घोषणा करीत होता जे त्या वेळेसाठी समर्पक होते. त्याला पिता करीत असलेल्या व करणार असलेल्या गोष्टींची जाणीव होती—पृथ्वीवर देवाची वर्तमान आणि येणारी कार्ये. लोक आत्म्याने आणि खऱ्यापणाने देवाची उपासना करतील त्या समयाच्या आरंभाचा उल्लेख करण्यासाठी त्याने या वाक्यांशाचा उपयोग केला, *"अशी वेळ येत आहे"* (योहान 4:21,23), आणि त्याच्या मरणातून पुन्हा जीवंत होण्याचा

उल्लेख करण्यासाठी देखील (योहान 5:25). दुसऱ्या ठिकाणी, तो अशा वेळेच्या आगमनाविषयी बोलला जेव्हा तो आपल्या शिष्यांशी अलंकारिक भाषेत बोलणार नाही तर पित्याविषयी स्पष्टपणे बोलेल (योहान 16:25).

यावरून आपणास शिकावयास मिळते की पृथ्वीवर देवाचे कार्य मुक्त व्हावे म्हणून देवाची विशिष्ट कार्ये अथवा समयावधी यासाठी ठरविलेली वेळ आहे. येशूला त्याच्या वधस्तंभावर जाण्याच्या वेळेची देखील जाणीव होती—तो त्यामुळे अचानक चकित झाला नाही. त्याला माहीत होते की अशी वेळ येईल जेव्हा त्याचे शिष्य पांगतील आणि त्याला सोडून जातील (योहान 16:32) आणि त्याला वधस्तंभावर खिळण्यात येईल (योहान 13:1; योहान 17:1).खरे म्हणजे, त्याने ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या जीवनाची व्यवस्था लावली होती की त्याच्या वधस्तंभावर खिळण्याचा समय अद्याप आलेला नव्हता (योहान 16:32). बायबल हे देखील म्हणते, *"... त्याला कोणी धरले नाही, कारण तोपर्यंत त्याची वेळ आली नव्हती"* (योहान 7:30; योहान 8:20). आमच्या स्वामीच्या जीवनाचा हा त्वरित आढावा घेण्याद्वारे, आम्हास दिसून येते की पृथ्वीवर आपले जीवन जगत असतांना त्याने पित्याच्या योजना आणि समयाची जाणीव ठेविली. त्याचे अनुकरण करणे आमच्यासाठी आव्हान आहे.

आम्ही आमच्या जीवनाचे व्यवस्थापन कसे करीत आहोत? आपण पित्यासोबत आणि आमच्यासाठी त्याच्याजवळ असलेल्या योजनेशी पावलात पाऊल टाकून आणि त्या वेळेत चालण्याचा प्रयत्न करीत आहोत का? शक्यता ही आहे की आमच्यापैकी काही जण परमेश्वरापुढे धावण्याचा प्रयत्न करतील. आम्हास प्रभूच्या चरणावर बसण्याचा सद्‌गुण अंगी बाणला पाहिजे, पण सोबतच प्रभूची वाट देखील पाहिली पाहिजे. बायबल आम्हास शिकविते की देव *"त्याची आशा धरून राहणाऱ्यांचे इष्ट काम"* करणारा आहे (यशया 64:4). माझ्या किशोरावस्थेत, जेव्हा

प्रभू पहिल्यांदा माझ्या जीवनाद्वारे कार्य करू लागला, तेव्हा कित्येक प्रसंगी मी सेवेच्या अशा क्षेत्रांत आणि मार्गांत बळजबरीने गेलो आहे. अर्थात, देवाने दया केली, कारण त्याला माहीत होते की या पुस्तकात मांडण्यात येत असलेल्या गोष्टींबाबत मी अज्ञान होतो, आणि त्याने त्या शिकण्यात माझी मदत केली. पण त्या दिवसांतही, मला हे पाहण्याचा आनंद मिळाला की देवाने अलौकिकरित्या माझ्या पवित्र धैर्यास आणि दाखविण्यात आलेल्या पुढाकारास आशीर्वादित केले. त्या प्रारंभिक दिवसांपासून स्थायी फळ निष्पन्न झाले आहे. आम्ही चर्चा करीत असलेली सत्ये समजल्यानंतर, आता ही शक्यता ठरते की आम्ही देवाच्या वेळेविषयी शिकावे. देव आम्हास ज्या गोष्टी करण्याकडे मार्गदर्शन करीत आहे, त्या आमच्या वैय्यक्तिक जीवनातील, सेवेतील, अथवा आमच्या व्यवसायातील का असेनात, आपण त्याच्या योजना आणि वेळ जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हास या गोष्टीची जाणीव बाळगण्याची गरज आहे की देवाजवळ प्रशिक्षणासाठी आणि तयारीसाठी एक वेळ आहे. देव त्याच्या “योद्ध्यांसाठी” “सेवांतर्गत” प्रशिक्षण पुरवितो. कधी कधी आपण भितीमुळे काही घटना, स्थान, अथवा अनुभव टाळण्याचा प्रयत्न करतो. आम्हास एकतर भिती असते की आपण अज्ञात गोष्टींस कसा प्रतिसाद देऊ किंवा आम्हास अज्ञाताची भिती वाटते. पण कधी कधी, देवाची आमच्यासाठी इच्छा असते की आम्ही त्याच परिस्थितींत प्रवेश करावा, त्यावर विजय मिळवावा, ते शिकावे, आणि त्यात प्रशिक्षण प्राप्त करावे. जीवनातील या परिस्थितीत वळणे दिसू शकतात, अथवा त्यात अनावश्यक विलंब होऊ शकतो. पण देव आमच्या फायद्यासाठी त्या गोष्टी घडवून आणतो.

जे लोक “खच्चरासारखे” आहेत त्यांच्यासाठी अनेक आश्चर्याच्या गोष्टी आहेत. हे असे लोक आहेत जे भूतकाळास–ज्ञात आणि परिचित—सोडावयास अनिच्छुक आहेत—आणि देवाच्या नव्या कार्यात पाऊल टाकण्यास घुटमळतात. देवाची नवी कार्ये अपरिचित आहेत, आणि त्यासाठी आमच्या वतीने विश्वासाची आणि धैर्याची गरज आहे की जे

काही देव आता करीत आहेत त्यात आम्ही पाऊल टाकावे.

देव आज पृथ्वीवर जे काही करीत आहे त्याची जाणीव ठेवण्याची आम्हास गरज आहे. आमच्यापैकी जे पुढारी आहेत त्यांची ही जबाबदारी आहे की त्यांनी आम्हास ज्या लोकांस सोपविण्यात आले आहे त्यांचे देवाच्या वेळेनुसार, अशा क्षेत्रांत आणि मार्गांत मार्गदर्शन करावे जे आमच्यासाठी तयार करण्यात आले आहेत.

# 3
# वेळ व ऋतू समजणे

**1 इतिहास 12:32अ**
**कालप्रवृत्ती ओळखून इस्राएलाने काय करावे हे ज्यांना कळत होते असे इस्साखार वंशातील दोनशे नायक आले ...**

वरील वचन एका विशिष्ट लोकांचा उल्लेख करते जे *"कालप्रवृत्ती ओळखू"* शकत होते. त्यांना *'कैरोस'*चे क्षण माहीत होते. त्यांच्या वेळेसाठी कोणती कृती सर्वात योग्य आहे हे त्यांना माहीत होते. वेळ आणि ऋतू समजून घेतल्याने आपल्याला काय करावे हे जाणून घेणे शक्य होईल. आपल्या वैयक्तिक जीवनात वेगवेगळ्या घटना घडतात, ज्यासाठी आपल्याला देवाच्या वेळेचा शोध घ्यावा लागतो—उदाहरणार्थ, सेवा सुरू करणे, विवाह, व्यवसायात बदल करणे, सुवार्तेच्या फायद्यासाठी धोरणात्मकपणे स्थान बदलणे किंवा नवीन व्यवसायात प्रवेश करणे. आपण काही "ऋतू" विचारात घेणार आहोत ज्यांचा पवित्र शास्त्रात विशेषतः उल्लेख केला गेला आहे.

## देवाच्या ताज्या हालचालींसाठी वेळ

आम्ही आधी सांगितले होते की, पृथ्वीवर देवाची कार्ये, हालचाल आणि व्यवहार यासाठी एक विशिष्ट वेळ आहे. देव उच्छृंखल मार्गाने कार्य करत नाही. उलट, त्याची एक पूर्व-नियुक्त वेळ आहे ज्यामध्ये तो नवीन कार्य सुरू करतो जे तो पृथ्वीवर साध्य करू इच्छितो. अनेक प्रसंगी, येशूने *"अशी वेळ येत आहे"* असा शब्दप्रयोग करून या वस्तुस्थितीचा उल्लेख केला. येशूच्या मते, अशी वेळ येत होती जेव्हा लोक आत्म्याने आणि *"खरेपणाने देवाची उपासना करतील"* (योहान 4:21,23). आम्ही अशा घटकेत जगत आहोत. देवाच्या देहधारी

पुत्राद्वारे सैतानाच्या अशा घोर पराजयाची इतिहासात ठरविलेली एक निश्चित वेळ होती. जेव्हा येशूला कळले की ही पूर्वनियुक्त वेळ आलेली आहे, तेव्हा त्याने घोषणा केली, *"आता ह्या जगाचा न्याय होतो, आता ह्या जगाचा अधिकारी बाहेर टाकला जाईल"* (योहान 12:31). आम्ही यावेळी देवाच्या आत्म्याच्या महान वृष्टीच्या समयात जगत आहोत, ज्याच्याविषयी योएल 2:28 आणि प्रेषितांची कृत्ये 2:17 मध्ये म्हटलेले आहे, *"शेवटल्या दिवसांत असे होईल की, मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन."* संपूर्ण मानवजातीवर देवाच्या आत्म्याची वृष्टी देवाच्या दिनदर्शिकेत त्या वेळेसाठी राखून ठेवलेली आहे आणि त्या काळासाठी ती परमेश्वराच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरते ज्यास "शेवटचे दिवस" म्हटलेले आहे—असे दिवस ज्यात आम्ही जगत आहोत.

पृथ्वीवर परमेश्वराच्या कार्याच्या हालचालीसंबंधाने आम्ही समजून घ्याव्या अशा अनेक गोष्टी आहेत.

## *कोणत्याही निश्चित कालावधीत पृथ्वीवर आत्म्याचे एकापेक्षा अधिक "कार्य" सुरू केले जाऊ शकते*

उदाहरणार्थ, आम्ही अशा काळात जगत आहोत जी केवळ आत्म्याने आणि खरेपणाने देवाची उपासना करण्याची वेळ आहे, पण आत्म्याची वृष्टी ग्रहण करण्याचीही वेळ आहे. आम्ही जाणावे हे अत्यावश्यक आहे. अनेक लोक ज्यांना या सत्याचे ज्ञान नाही त्यांनी स्वतःला मर्यादित केले आहे—त्याद्वारे त्यांच्या जीवनातील देवाच्या कार्यास—पृथ्वीवर देव करीत असलेल्या अनेक आणि विविध कार्यांपैकी एका कार्याप्रत. मग ते त्यांची मर्यादित समज आणि दृष्टिकोन अशाप्रकारे मांडतात जणू काही देव केवळ तेच कार्य करीत आहे, आणि स्पष्टपणे हा एक अस्वस्थ दृष्टिकोन आहे. देव जे काही करीत आहे त्याविषयी आम्हास ख्रिस्ती ह नात्याने, ज्ञान असले पाहिजे आणि आम्ही त्यासाठी स्वतःचे अंतःकरण मोकळे ठेवले पाहिजे. देव आमच्या जीवनांद्वारे जे काही करण्याची

इच्छा धरतो त्याचा आम्ही स्वीकार केला पाहिजे. देव जे काही करीत आहे त्याच्या विविध पैलूंपैकी आम्ही काहींचा उल्लेख करू इच्छितो — आम्ही “वचनाची मोठी चळवळ” पाहिली आहे जेथे परमेश्वराचे वचन शिकविण्यावर मोठा भर दिला गेला होता आणि विश्वास, दैवी आरोग्य, मुक्ति, समृद्धी, आणि इतर विषयांवर बरेच स्पष्टीकरण मांडण्यात येत होते. त्यानंतर सापेक्षरित्या नवीन कार्ये सुरू झाली ज्यात विश्व मिशन, मंडळीची वाढ, स्तुति, आणि उपासना, कुटुंब, सामाजिक / राजकीय कार्य, आध्यात्मिक युद्ध, भविष्यात्मक आणि प्रेषिताच्या सेवेसंबंधी कार्य यावर भर दिला गेला होता. आपले अंतःकरण मोकळे करा, जे आपण जाणता त्यापलीकडे पोहोचण्याचा प्रयत्न करा आणि परमेश्वर जे करीत आहे त्या वेगवेगळ्या गोष्टींचा स्वीकार करावयास पुढे व्हा. आपल्या जीवनात स्वतःस आणि देवाच्या कार्यास मर्यादित करू नका. आणि परमेश्वर करीत असलेल्या वेगळ्या कार्यात सहभागी होणाऱ्या वेगळी “भाषा” बोलणाऱ्याप्रत सहनशील असा.

## *परमेश्वराचे प्रत्येक कार्य विशिष्ट हेतू पूर्ण करते*

वर्तमान काळातील आत्म्याच्या वृष्टीचे हेतू स्पष्टपणे येशूने मांडले होते, *“पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल”* (प्रेषितांची कृत्ये 1:8). परमेश्वर जे करीत आहे ते तो का करीत आहे याचे परीक्षण करण्याची आणि ते समजून घेण्याची आम्हास गरज आहे. अन्यथा आम्ही फक्त त्याच्या “स्वरूपात” सहभागी होऊ आणि “हेतू” गमावून बसू. याद्वारे आम्हास देवाने ठरविलेले हेतू पूर्ण करण्यात, आमच्या प्रयत्नांचे मूल्यमापन करण्यात मदत मिळेल.

## *परमेश्वराचे प्रत्येक कार्य परमेश्वराच्या दुसऱ्या प्रत्येक कार्यास पूरक ठरते*

परमेश्वराची वेगवेगळी कार्ये एकमेकांचे खंडन करीत नाहीत तर त्या प्रत्येक गोष्टीत भर देते जी परमेश्वर करीत आहे. उदाहरणार्थ, पवित्र

आत्म्याची वृष्टी आम्हास साक्ष बनावयास समर्थ करीत नाही तर आम्हास आत्म्याने आणि खरेपणाने देवाची उपासना करण्याचे सामर्थ्य पुरविते. आत्म्याने देवाची उपासना केल्याने आम्ही केवळ पित्यास प्रसन्न करीत नाही तर हे शत्रूविरूद्ध देखील एक हत्यार ठरते आणि पलीकडील क्षेत्रांत सुवार्तेचा प्रसार करण्यात त्याद्वारे मदत प्राप्त होते. म्हणून, वेगवेगळ्या कार्यांत सहभागी असलेल्यांशी मदत करा आणि त्यांच्यापासून शिका, यासाठी की तुमचे जीवन समृद्ध व्हावे.

## *देवाच्या भूतकाळातील कार्य जेव्हा आम्ही सुरू ठेवतो तेव्हा चुका करण्याची शक्यता असते*

परमेश्वराची मागील कार्ये जाणून घेणे महत्वाचे आहे, पण आपण स्वतःस भूतकाळात जगण्याची मुभा देऊ शकत नाही. कराराच्या देशाचा प्रवास करणाऱ्या इस्राएली लोकांचा विचार करा. अनेक प्रसंगी ते निराश झाले होते. ते देवाविरूद्ध आणि मोशेविरूद्ध तक्रार करीत होते. अशा एका प्रसंगी, परमेश्वराने अग्नीमय सर्पांस त्यांच्या तंबूत प्रवेश करण्याची परवानगी दिली आणि अनेकांस मारून टाकले. जेव्हा लोकांनी पश्चाताप केला, तेव्हा देवाने मोशेला आज्ञा दिली की त्याने पितळेचा साप बनवावा आणि त्याला एका खांबावर टाकावे यासाठी की *"सर्पदंश झालेल्या कोणा माणसाने त्याच्याकडे पाहिले तर तो जगेल"* (गणना 21:1-9). आणि म्हणून, असे झाले. इतिहासात काही शेकडो वर्षे पुढे चालत असतांना, आम्ही पाहतो की इस्राएली लोक मोशेने घडविलेल्या पितळेच्या सापापुढे धूप जाळू लागले, आणि तो उपासनेचा विषय ठरला (2 राजे 18:4). हे घातक दुष्कृत्य देवाच्या लोकांमधून नष्ट करण्यासाठी देवाने राजा हिज्कियास उभारले. आज अनेक लोक आहेत ज्यांनी देवाच्या भूतकाळातील कार्याच्या अवशेषांस मूर्तीपूजेच्या स्वरूपात मजबूतीने पकडून ठेविले आहे. यामुळे आपण भ्रमात आणि फसवणूकीत पडतो ज्यामुळे परमेश्वर अप्रसन्न होतो.

## *देव करीत असलेल्या नवीन गोष्टींत पाऊल टाकण्यासाठी* अनिच्छुक असणे महाग पडू शकते

अनेकदा, एखाद्या निश्चित "पद्धतीची" आम्हाला सवय झालेली असते ज्यात आम्ही देवाला कार्य करतांना आणि त्याचे सान्निध्य प्रगट करतांना पाहिलेले असते, त्यामुळे आम्ही त्या विशिष्ट पद्धतीस धरून राहतो ज्यात परमेश्वर कार्य करतो. आम्ही नवीन पद्धतींचा स्वीकार करीत नाही ज्यात परमेश्वर देव सांप्रतकाळी कार्य करू इच्छितो. जुन्या करारातील थोर पुढारी मोशेचा विचार करा. अशी वेळ होती जेव्हा देवाने त्याला खडकावर मारावयास लावले, आणि त्याने तसे केले, त्यातून पाणी वाहू लागले आणि इस्राएली लोकांची तहान भागली (निर्गम 17:1-7). मग काही वर्षानंतर, जेव्हा लोकांना पाण्याची गरज भासली, तेव्हा मोशेला अगदी अशाच परिस्थितीला तोंड द्यावे लागले. तथापि देवाने या वेळी त्याला आज्ञा दिली की आपल्या लाठीने खडकास मारण्याऐवजी त्याने त्यास उद्देशून बोलावे. इस्राएली लोकांच्या तक्रारीने अत्यंत त्रस्त झालेल्या मोशेने खडकाऐवजी त्यास मारले. त्याने दोनदा खडकास मारले (गणना 20:1-13). अर्थात, पाणी वाहू लागले, पण देवाने अविश्वास आणि अवज्ञा यासाठी मोशेला जबाबदार ठरविले. असे दिसते की समयाच्या त्या क्षणी, मोशेने पूर्वी जे केले होते ते करणे त्याला अधिक सोयिस्कर वाटले आणि त्याला वाटले की ते यशस्वी होईल. खडकाशी बोलणे त्याला सोईचे वाटले नाही. कदाचित, तो विसरून गेला की त्या अद्‌त कार्यांमागे देव कारण होता, खडक नव्हे. मोशेला त्याच्या अविश्वासासाठी अनेक गंभीर परिणामांस तोंड द्यावे लागले. आपण त्या नवीन पद्धतींसाठी आपले अंतःकरण मोकळे ठेविले आहे का ज्यात देव कार्य करू इच्छितो, परिणाम सारखेच असले तरीही?

## *दृष्टांत पूर्ण होण्याची वेळ*

**हबक्कूक 2:2,3**

**2 मग परमेश्वराने मला उत्तर दिले की,**

**"हा दृष्टान्त लिहून काढ,**
**पाट्यांवर ठळक लिही;**
**म्हणजे कोणीही तो वाचून धावत सुटावे.**
**³ कारण हा दृष्टान्त नेमलेल्या समयासाठी आहे आणि तो शेवटास जाण्यास आपणच नेट करत आहे, तो फसवायचा नाही;**
**त्याला विलंब लागला, तरी त्याची वाट पाहा;**
**तो येईलच,**
**त्याला विलंब लागायचा नाही."**

परमेश्वर आपल्या अंतःकरणात आणि जीवनात बोलत असलेल्या प्रत्येक शब्दाच्या फलवंत होण्याचा एक नेमलेला समय आहे. बाळास जन्म देणाऱ्या स्त्रीसारखी ही प्रक्रिया आहे. ही घटना गर्भधारणासारखी आहे–देव त्याचे स्वप्न, त्याची कल्पना, त्याची कार्यपद्धती, आणि त्याची योजना आपल्या अंतःकरणात टाकतो. मग विकासाची वेळ येते जेथे व्यक्ती या नात्याने तुम्ही, आणि इतर आवश्यक घटना त्या योजनेत अनुरूप बसतात. शेवटी जन्माची वेळ येते—दृष्टांत सत्य रूपात प्रगट होतो. पण आम्हास हे जाणून घेण्याची गरज आहे की वाट पाहण्याची एक वेळ असते—अशी वेळ—जो दृष्टांत दिला जातो त्या वेळेपासून तो दृष्टांत वास्तविकता ठरेपर्यंत. या कालावधीत तो दृष्टांत पूर्ण व्हावा म्हणून देव आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट एकत्र जोडत असतो—लोक, स्थान, वस्तु—ज्याद्वारे आम्ही तो दृष्टांत पूर्ण करावयास सक्षम व्हावे. आम्ही तयार झाल्यानंतर आणि सर्व गोष्टी अनुरूप झाल्यानंतर, मग *'कैरोस'* क्षण येतो—तो दृष्टांत पूर्ण करण्याची वेळ.

## फळाचा आस्वाद घेण्याची वेळ

**स्तोत्रसंहिता 1:3अ**
**जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते,**
**जे आपल्या हंगामात फळ देते,**
**ज्याची पाने कोमेजत नाहीत.**

फळ आपल्या हंगामी येते. यावरून हे सूचित होते की अशी वेळ आहे ज्यात आपण आपल्या श्रमाचे फळ पाहतो आणि त्याचा आस्वाद घेतो. आमच्यापैकी काही जण एका विशिष्ट क्षेत्रात तत्परतेने श्रम करीत असतील ज्यासाठी प्रभूने आम्हास पाचारण केले आहे. बरेचदा, जेव्हा आपणास लगेच फळ दिसून येत नाही, अथवा, जेव्हा आपणास अपेक्षित वेळी फळ दिसत नाही, तेव्हा आपण निराश होतो. फळाचा हंगाम नसतांना त्याचा शोध घेणे निराशाजनक असू शकते. आम्हास हे समण्याची गरज आहे की फळ त्याच्या हंगामी येते. आमच्या श्रमाचा परिणाम अंकुरित व्हावा, प्रफुल्लित व्हावा, आणि त्यास फळ यावे यासाठी एक वेळ ठरविलेली आहे. श्रम करीत असतांना, आपण हंगामाच्या प्रभूकडे पाहू शकतो कारण तो त्याच्या वेळेत आम्हास प्रतिफळ देतो.

## कसोटीचा आणि परीक्षेचा समय

**लूक 4:13**
**मग सैतान सर्व परीक्षा संपवून संधी मिळेपर्यंत त्याला सोडून गेला.**

**इफिसकरांस पत्र 6:13**
**ह्या कारणास्तव तुम्हांला वाईट दिवसांत प्रतिकार करता यावा व सर्वकाही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री घ्या.**

काही समय आणि ऋतु आहेत ज्यांस सैतान विश्वासणाऱ्याविरूद्ध आपले आक्रमण करण्यासाठी *"उपयुक्त समय"* म्हणून पाहतो. सैतान उपयुक्त समयी आक्रमण करण्याची योजना आखतो. अशा समयांचा उल्लेख इफिसकरांच्या पत्रात *"वाईट दिवस" (इफिसकरांस पत्र 6:13)* म्हणून करण्यात आला आहे. हा असा समय आहे जेव्हा काही कारणास्तव आपण शत्रूपुढे अत्यंत दुर्बळ ठरू शकतो किंवा शत्रूसाठी दार मोकळे सोडू शकतो. येशूने अशा समयाचा उल्लेख *"परीक्षेची वेळ"* म्हणून केला आहे (लूक 8:13). म्हणून, आम्हाला सावध करण्यात आले आहे की आम्ही *"सावध असावे, जागे राहावे"* (1 पेत्र 5:8). आम्हाला हे समजणे महत्वाचे

आहे की आमच्या विरोधात वाईटाच्या आक्रमणाचे निश्चित काळ आणि ऋतु आहेत. अशी वेळ येईल जेव्हा युद्ध इतर वेळेपेक्षा आणखी कठीण आणि घोर होत जाईल. तथापि, आम्हास माहीत आहे की आम्ही दृढ उभे राहून शत्रूचे प्रत्येक कार्य हाणून पाडू शकतो. सामान्यतः, सैतानाच्या घोर आक्रमणाचे हे क्षण या गोष्टीचे दर्शक आहे की आम्ही आमच्या जीवनात मुख्य विजय आणि संजीवन प्राप्त करणार आहोत. तसेच, तसेच इतर विश्वासणारे ज्या ऋतूंमधून जात आहेत त्यांच्याप्रत संवेदनशील राहिल्याने आम्हास त्यांच्यासोबत उभे राहण्यास आणि अशा वेळी त्यांचे सहाय्य करण्यास सामर्थ्य प्राप्त होईल. देवाने *"संकटसमयी"* (स्तोत्रसंहिता 41:1) आणि *"विपत्काली"* (स्तोत्रसंहिता 37:18,19) आपले सहाय्य पुरविण्याचे अभिवचन दिले आहे.

## हंगामाचा समय

**प्रेषितांची कृत्ये 16:6,7**

**6 नंतर आशिया प्रांतात वचन सांगण्यास त्यांना पवित्र आत्म्याकडून प्रतिबंध झाल्यामुळे ते फ्रुगिया व गलतिया ह्या प्रांतांमधून गेले.**

**7 आणि मुसियापर्यंत आल्यावर बिथुनियास जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु येशूच्या आत्म्याने त्यांना जाऊ दिले नाही.**

आमचा देव हंगामाचा प्रभू आहे. राष्ट्रे त्याची हंगामाची शेते आहेत. त्याला माहीत आहे की त्याच्या हंगामाच्या शेतांपैकी कोणते पिकले आहे, किंवा सर्वच एका वेळी पिकणार नाहीत. आम्हाला पौल आणि त्याच्या सोबत्यांचे अनुभव माहीत आहेत ज्यांनी सुवार्ता गाजविण्याच्या हेतूने काही क्षेत्रांत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, पण पवित्र आत्म्याने त्यांना परवानगी दिली नाही. एखादे विशिष्ट क्षेत्र सुवार्तेसाठी अद्याप का तयार नाही याची अनेक कारणे असू शकतात. कदाचित, लोक वचनाचा स्वीकार करावयास तयार नाहीत आणि हे कार्य प्रार्थनेद्वारे आणि मध्यस्थीद्वारे केले पाहिजे. कदाचित, मजूर त्या क्षेत्रातील कामाच्या आव्हानांस तोंड देण्यास सज्ज नसतील किंवा कदाचित, नंतर त्यात

पाऊल टाकल्याने मोठा हंगाम प्राप्त होईल. काही का असेना, जेव्हा आपण देवाच्या हंगामाच्या शेतांमध्ये पाऊल टाकतो, तेव्हा आपण संवेदनशील राहून पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाचे अनुसरण करावे, त्याच्या पावलात पाऊल टाकून आणि त्याच्या वेळेसोबत चालावे.

## परमेश्वराचे घर बांधण्याची वेळ

**हाग्गय 1:1-4**

**1 दारयावेश राजाच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या वर्षी, सहाव्या महिन्याच्या प्रतिपदेस यहूदाचा प्रांताधिकारी शल्तीएल ह्याचा पुत्र जरूब्बाबेल व मुख्य याजक यहोसादाकाचा पुत्र यहोशवा ह्यांना हाग्गय संदेष्ट्याच्या द्वारे परमेश्वराचे वचन प्राप्त झाले ते हे:**
**2 सेनाधीश परमेश्वर म्हणतो, "हे लोक म्हणतात की वेळ अजून आली नाही, परमेश्वराचे मंदिर बांधण्याची वेळ अजून आली नाही."**
**3 तेव्हा परमेश्वराचे वचन हाग्गय संदेष्ट्याच्या द्वारे प्राप्त झाले ते असे:**
**4 "इकडे मंदिर ओसाड पडले असून तुम्ही स्वतः आपल्या तक्तपोशीच्या घरात राहावे असा समय आहे काय?"**

**हाग्गय 1:8**

**"डोंगरावर जाऊन लाकडे आणा व मंदिर बांधा; त्याने मी प्रसन्न होईन व माझा महिमा प्रकट करीन," असे परमेश्वर म्हणतो.**

जुन्या करारातील देवाचे लोक देवाचा समय चुकले आणि ते अनुचित गोष्टी करण्याचे दोषी ठरले. त्यांनी मंदिराच्या पुनर्बांधणीच्या कामाकडे दुर्लक्ष केले आणि स्वतःची घरे बांधण्यात गुंतून गेले. यात समानता स्थापित करण्याद्वारे, आपण जाणतो की आमच्या दिवसात देव असे मंदिर बांधत आहे जे "विटा आणि गारांनी" बांधले जाणार नाही, तर "जिवंत दगडांनी" बांधले जाईल. ही मंडळी आहे जिच्याविषयी येशूने म्हटले की तो बनविल आणि जिच्यासाठी त्याने सेवाकार्याची कृपादाने ठरविली आहेत आणि पवित्रजनांस पाचारण केले आहे (इफिसकरांस पत्र 4:7-11). आम्ही अशा समयात आहोत जेव्हा अधिकाधिक लोकांस प्रभूचे घर बांधण्याची गरज भासेल, आणि स्वतःची

ऐहिक घरे बांधण्याची नाही. अशी वेळ येत आहे जेव्हा देव आपल्या लोकांस पाचारण करील, जुन्या काळाप्रमाणे, की त्यांनी स्वतःची घरे बांधणे (आपले व्यक्तिगत सुखविलास अथवा व्यक्तिगत ख्रिस्ती उद्योग स्थापन करणे) बंद करावे आणि मंडळीच्या निर्माणकार्यात गुंतावे. याचा अर्थ असा की आपण त्यागपूर्ण भावनेने जगण्याची, उदारतेने देण्याची, आणि निर्भयतेने पुढे वाढण्याची जीवनशैली अंगी बाणावी.

## मौन वर्षे

**गलतीकरांस पत्र 1:15-18**

**15,16 तरी ज्या देवाने मला माझ्या मातेच्या उदरातून जन्मल्यापासून वेगळे केले व आपल्या कृपेने बोलावले, त्याला आपल्या पुत्राला माझ्या ठायी प्रकट करणे बरे वाटले, अशासाठी की, मी परराष्ट्रीयांमध्ये त्याच्या सुवार्तेची घोषणा करावी; तेव्हा मानवांची मसलत न घेता,**
**17 आणि माझ्यापूर्वी झालेल्या प्रेषितांकडे यरुशलेमेस वर न जाता, मी लगेच अरबस्तानात निघून गेलो; व तेथून दिमिष्कास पुन्हा परत आलो.**
**18 मग तीन वर्षांनंतर मी केफाला भेटायला यरुशलेमेस वर गेलो, व त्याच्याजवळ पंधरा दिवस राहिलो.**

**गलतीकरांस पत्र 2:1**

**नंतर चौदा वर्षांनी बर्णबाबरोबर मी पुन्हा यरुशलेमेस वर गेलो. मी आपल्याबरोबर तीतालाही घेतले होते.**

आपण संपूर्ण पवित्र शास्त्रात पाहतो की परमेश्वराच्या अनेक सेवकांनी–ज्यांस परमेश्वराने उभारले असे पुढारी–तयारीत अनेक “मौन” वर्षे घालविली. आम्ही त्या वर्षांचा “मौन” म्हणून उल्लेख करतो कारण त्यांनी त्या कालावधीत काय केले याविषयी सांगण्यात आलेले नाही. देवाने त्यांस जे करण्यासाठी पाचारण केले होते ते करण्यासाठी त्यांस प्रशिक्षित आणि तयार केले जात होते. आणि मग त्या मौन वर्षांच्या शेवटी, देवाने त्यांना एक मुख्य सेवा सुरू करून दिली. आपण हे पौलाच्या जीवनात स्पष्टपणे पाहतो. त्याचे तारण झाले आणि त्याला प्रेषित होण्यासाठी पाचारण करण्यात आले. पण नंतर अनेक वर्षांनी

त्याने प्रेषिताच्या अभिषेकाच्या पूर्णतेत प्रवेश केला. त्याच्या तारणानंतर, त्याने अरेबियात अनेक मौन वर्षे घालविली. कदाचित 10 वर्षांनंतर, त्याने अंत्युख येथील मंडळीत शिक्षक म्हणून आपली सार्वजनिक सेवा सुरू केली. तीन वर्षांनंतर त्याला पवित्र आत्म्याने त्याचे प्रेषित म्हणून कार्य सुरू करावयास पाचारण केले (प्रेषितांची कृत्ये 13:1-3). आम्ही हे आमच्या प्रभू येशूच्या जीवनात पाहतो ज्याने आपली सार्वजनिक सेवा सुरू करण्यापूर्वी 30 मौन वर्षे घालविली. योसेफाने सुमारे 13 वर्षे वाट पाहिली, मोशे 40 वर्षे थांबला, आणि ही यादी पुढे जाते. हे समजणे महत्वाचे आहे की मौन वर्षे निष्क्रियतेचा समय नाही. तर, हा तयारीचा काळ आहे जेथे देवाने आपणास जे करावयास पाचारण केले आहे त्याचे महत्वपूर्ण पैलू आपण शिकतो. देव व्यक्तीस ज्या तयारीतून नेतो ती दुसऱ्या व्यक्तीच्या तयारीपासून वेगळे असू शकते. देवाची "प्रशिक्षण शाळा" प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी आहे. आमच्यापैकी अनेक जण प्रशिक्षण काळात आहेत. आता आपण जे करतो ते पुढे जे होणार आहे त्यासाठी मूलभूत आहे. म्हणून त्या कार्यास विश्वासू राहा, आणि सर्वात जास्त म्हणजे, शिकावयास, प्रशिक्षण घ्यावयास आणि तयार होण्यास तत्पर असा.

# 4
# विवेक बुद्धीने आपल्या जीवनाची व्यवस्था लावणे

**उपदेशक 8:5आ, 6अ**

**5 ... नेमलेला काळ व न्यायसमय हे ज्ञान्याच्या मनाला अवगत होतील.**
**6 प्रत्येक गोष्टीला नेमलेला काळ व न्यायसमय असतो ...**

**लूक 12:54-56**

**54 आणखी तो लोकसमुदायांनाही म्हणाला, "जेव्हा तुम्ही ढग पश्चिमेकडून वर येताना पाहता तेव्हा तुम्ही लगेचच म्हणता, 'पावसाची सर येत आहे,' आणि तसे घडते.**
**55 दक्षिणेचा वारा सुटतो तेव्हा 'कडाक्याची उष्णता होईल,' असे तुम्ही म्हणता आणि तसे घडते.**
**56 अहो ढोंग्यांनो, तुम्हांला पृथ्वीवरील व आकाशातील लक्षणांचा अर्थ लावता येतो, तर ह्या काळाचा अर्थ तुम्ही का लावत नाही?"**

शहाणा माणूस कोणत्याही कामासाठी योग्य वेळ आणि योग्य कृती दोन्ही ओळखू शकतो. प्रत्येक बाबीसाठी आणि कार्यासाठी —सेवा सुरू करणे, विवाह, व्यवसायात बदल करणे, सुवार्तेच्या फायद्यासाठी धोरणात्मकरित्या स्थान बदलणे किंवा नवीन व्यवसायात प्रवेश करणे–योग्य वेळ आणि योग्य कृती करणे (योग्य गोष्टी). देवाने आपल्याला बुद्धिमान लोक होण्यासाठी पाचारण केले आहे—जे लोक वेळ आणि निर्णयशक्ती दोन्ही ओळखण्यास सक्षम असतील.

आपल्या आयुष्यातील वेळ आणि ऋतू ओळखणे (वैय्यक्तिकरित्या किंवा सामुहिकरित्या) योग्य कारवाई करण्याची जबाबदारी आपल्यावर आणते. पौलाने लिहिले आहे, *"समय ओळखून हे करा, कारण तुम्ही*

*आता झोपेतून उठावे अशी वेळ आली आहे ... रात्र सरत येऊन दिवस जवळ आला आहे; म्हणून आपण अंधकाराची कर्मे टाकून द्यावीत आणि प्रकाशाची शस्त्रसामग्री धारण करावी. दिवसाढवळ्या साजेल असे आपण शिष्टाचाराने चालावे ..."* (रोमकरांस पत्र 13:11-13). वेळ काय आहे हे आपल्याला माहीत असल्याने आपल्याला अनुरूप जीवन जगण्याचा सल्ला दिला जात आहे. विवेकी लोक असे लोक आहेत जे काळाची स्पष्ट समज घेऊन त्यांचे जीवन व्यवस्थित करतात. हे असे लोक आहेत ज्यांना *"समयोचित बोल"* (नीतिसूत्रे 15:23) कसे बोलावे हे माहित आहे कारण त्यांनी देवाचा आवाज ऐकण्यासाठी स्वतःला शिस्त लावली आहे (यशया 50:4,5). देवाची सेवा करताना ते नेहमी तयार असतात. ते *"सुवेळी अवेळी तयार"* असतात (2 तीमथ्य 4:2). देव त्यांना कधीही बोलावू शकतो कारण ते ज्या काळात राहतात त्या वेळेची निकड त्यांना माहीत आहे. त्यामुळे ते सतत तत्परतेने शिस्तबद्ध जीवन जगतात. हे असे लोक आहेत जे धैर्य सोडत नाहीत आणि कधीही चांगले करण्यास कंटाळत नाहीत कारण त्यांना माहित आहे की ते *"यथाकाळी"* प्रतिफळ प्राप्त करतील (गलतीकरांस पत्र 6:9). ते असे लोक आहेत जे नम्रतेने जगतात आणि चालतात, प्रसिद्धीच्या शोधात नसतात किंवा त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करीत नाहीत. ते मनुष्याची स्तुती प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत नाहीत कारण त्यांना माहित आहे की देव त्यांना *"योग्य वेळी"* उंच करेल (1 पेत्र 5:5,6). आपण आपले जीवन कसे व्यवस्थित करीत आहोत? आपण देवाच्या घड्याळानुसार जगण्याचा, वेळेनुसार चालण्याचा आणि त्याच्याबरोबर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत का? किंवा आपण फक्त वाटेल तसे जीवन जगत आहोत, गोष्टी करत आहोत कारण आपण इतरांना ते करताना पाहतो. आपण विवेकबुद्धीने आपले जीवन व्यवस्थित करू या—आपल्या प्राधान्यक्रमांचे पुनर्स्थापन करून, आपले वेळापत्रक बदलून, देव आपल्याला ज्या काळामध्ये आणि ऋतूंमध्ये घेऊन जात आहे त्यानुसार आपले जीवन बदलू या.

वेळ ओळखण्यात सक्षम असणे म्हणजे प्रचलित परिस्थितीचे निरीक्षण करून हवामान सांगण्यास सक्षम असण्यासारखे आहे. येशूने ही तुलना त्याच्या पाठोपाठ येणाऱ्या लोकसमुदायाला त्याच्या तीव्र दटावणीमध्ये वापरली. लोकांनी ढगांची स्थिती आणि वाऱ्याची दिशा पाहिली आणि त्यामुळे त्यांना हवामानाचा अंदाज लावता आला. तथापि, ते वेळ ओळखू शकले नाहीत. या उपयुक्त उपमेवरून, आपण काही विचार मांडू शकतो ज्यामुळे देव आपल्याला ज्या काळ आणि ऋतूंमधून पुढे नेत आहे ते ओळखण्यात आणि योग्य रीतीने प्रतिसाद देण्यास मदत करील. वेळ आणि ऋतू जाणून घेण्याची गुरुकिल्ली आहे निरीक्षण करणे.

## तुमच्यातील देवाच्या आत्म्याच्या मार्गदर्शनाचे निरीक्षण करा

तुमच्यामध्ये कार्य करण्याच्या प्रक्रियेत, देव तुम्हाला त्याच्या योजना आणि हेतू प्रगट करतो. तीव्र इच्छा, स्वप्ने आणि आशा आहेत ज्या तो त्याच्या आत्म्याद्वारे आणि त्याच्या वचनाद्वारे तुमच्यामध्ये जन्मास आणील. तुम्हाला एक ज्वलंत उत्कटता लाभेल—हरवलेल्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याची, त्याचे वचन शिकवण्याची, एक व्यवसायिक बनण्याची आणि असे काहीतरी—आंतरिक मनुष्यात प्रज्वलित होणे. हा देव तुमच्याशी संवाद साधत आहे. देवाच्या अशा कार्यांकडे लक्ष द्या.

## आपल्या जीवनातील परिस्थिती आणि घटनांचे निरीक्षण करा

आपल्या वेळा, आपल्या जीवनातील घटना, देवाच्या हातांत आहेत (स्तोत्रसंहिता 31:15). कोणत्याही गोष्टी सहज घडत नाहीत. हे समजून घ्या की, अनेकदा, परमेश्वर विशिष्ट घटना आणि परिस्थिती आपणासाठी जुळवित असतो. असे काही तरी आहे जे तो तुम्हास तुमच्या मार्गात येणाऱ्या गोष्टींद्वारे कळवित आहे. कदाचित, देवाच्या माणसासोबत दैवी भेट अथवा एखाद्या विशाल कार्यमंडळाच्या अध्यक्षाशी भेट घडून येणे.

एका विशिष्ट कार्यात सहभागी होण्याची ती संधी असू शकते, प्रचार करण्यात येणारा विशिष्ट संदेश ऐका, किंवा आपला मित्र व्यक्त करीत असलेले विचार ऐका. देव तुमच्याशी जीवनातील सामान्य घटनांद्वारे बोलू शकतो. हे जाणण्याप्रत संवेदनशील असा की देव केव्हा बोलत आहे (आणि तो केव्हा बोलत नाही!) आणि जे तो बोलत आहे त्याचे निरीक्षण करा.

## लगेच होणाऱ्या घटनांशी आपल्यामधील देवाच्या आत्म्याच्या कार्याचा संबंध जोडून पाऊल उचला

जर आपण वाटेवर आहात आणि आपण काळे ढग आकाशात गोळा होतांना पाहता आणि तुम्हाला पावसाचा वास येऊ लागतो किंवा पावसाचे पहिले थेंब अंगावर पडू लागतात, तेव्हा सामान्यतः तुम्ही असुरक्षित उभे राहून ओले होणार नाही. तुम्ही छत्री उघडाल किंवा आश्रय शोधाल. त्याचप्रमाणे, आत्म्याच्या मार्गदर्शनासाठी आणि आपल्या जीवनातील परिस्थितींसाठी संवेदनशील असतांना, आपणास दोघांचा सतत संबंध जोडण्याची आणि योग्य पाऊल उचलण्याची गरज आहे.

## जीवनाच्या ऋतूंबद्दल संवेदनशील रहा

जे लोक जगाच्या अशा भागात राहतात जेथे तापमान कमालीचे आहे, त्यांना त्या ऋतूसाठी योग्य कपडे घालण्याचे महत्त्व माहित आहे. हिवाळ्यात, ते त्यांचे जाड उबदार कपडे काढतात आणि उन्हाळ्यात ते हलके कपडे घालतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, आम्ही प्रचलित हवामानाच्या परिस्थितीनुसार आमच्या परिधानाशी जुळवून घेतो. त्याच अर्थाने, विश्वासणारे या नात्याने, आपण आपले जीवन व्यवस्थित केले पाहिजे आणि देव आपल्याला ज्या जीवनकाळात घेऊन जात आहे

त्यानुसार आचरण केले पाहिजे.

## देव तुम्हाला तयारीच्या ऋतूमधून घेऊन जाईल

आपल्या सर्वांना हे समजते की देवाने आपल्याला जे काम करण्यासाठी बोलावले आहे त्यासाठी तो आपल्याला तयार करतो. आपण हे समजण्यात अयशस्वी होऊ शकतो की सामान्यतः तयारीचे अनेक ऋतू असतात. उदाहरणार्थ, तुम्ही तयारीच्या एका ऋतूत जाऊ शकता जेथे तुम्ही नवीन कौशल्ये आणि क्षमता शिकता आणि विकसित करता. तुम्ही असे गृहीत धरू शकता की एकदा हे संपल्यानंतर, तुमच्या मनात असलेले स्वप्न आणि योजना पूर्ण करण्यासाठी देव तुम्हाला पाठवील. हे आश्चर्यचकित करणारे असू शकते की जेव्हा हा ऋतू संपतो तेव्हा, तुमच्या हृदयातील स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढे जाण्याऐवजी, तुम्ही तयारीच्या दुसऱ्या ऋतूत पाऊल टाकता जेथे देव तुमच्या जीवनातील इतर काही पैलूंशी व्यवहार करतो. कदाचित या ऋतूमध्ये, तो तुमच्या हृदयातील समस्यांना सामोरे जाण्यास सुरुवात करतो—चारित्र्य आणि शिस्त विकसित करणे आणि मजबूत करणे.

## प्रत्येक ऋतू तुम्हाला पुढील गोष्टीसाठी तयार करतो

देव तुम्हाला ज्या वेगवेगळ्या ऋतूंतून नेतो, ते जीवनाचे वेगळे काळ नाहीत ज्यातून तुम्ही जाता आणि विसरता. उलट, प्रत्येक ऋतू जीवनाम्ह च्या मागील ऋतूवर निर्माण केला जातो. आयुष्याच्या या ऋतूमध्ये तुम्ही ज्या गोष्टी शिकता त्या तुम्हाला आयुष्याच्या पुढील किंवा भविष्यातील ऋतूंमध्ये येणाऱ्या आव्हानांसाठी तयार करतील. त्यामुळे जीवनातील प्रत्येक ऋतू महत्त्वाचा आहे.

## जेव्हा ऋतू बदलतात तेव्हा बदलण्यास तयार रहा

जेव्हा ऋतू बदलतात आणि जीवन संक्रमणातून जाते, तेव्हा बदल आवश्यक होईल. उदाहरणार्थ, जीवनाच्या सध्याच्या हंगामात तुम्ही

एका विशिष्ट ठिकाणी राहत असाल, विशिष्ट मित्र असतील आणि तुम्ही विशिष्ट क्रियाकलापांमध्ये गुंतलेले असाल. देवाची अशी अपेक्षा असते की जेव्हा तो तुमच्या जीवनाचा ऋतू बदलतो, तेव्हा तुम्ही नवीन ठिकाणी जावे, नवीन मित्र बनवावे आणि पूर्णपणे नवीन प्रकारच्या क्रियाकलापात सहभागी व्हावे. तथापि, तुमच्यापैकी काहींना हे करणे कठीण वाटू शकते, कारण तुम्हाला परिचित लोकांबद्दल सोयीस्कर वाटते आणि कदाचित अनोळखी लोकांची भीती वाटू शकते. तुम्ही तुमच्या वर्तमानातून तुमच्यासाठी देवाजवळ असलेल्या भविष्याकडे जाण्यास तयार असले पाहिजे.

## दूरदृष्टी ठेवा आणि पुढील हंगामाची तयारी करा

काही वेळा, तुम्हाला जाणीव असते की तुमच्या आयुष्याचा ऋतू एका विशिष्ट वेळी बदलेल. उदाहरणार्थ, तुम्ही अविवाहित राहण्यापासून विवाहित व्यक्ती बनण्याकडे वाटचाल करत आहात, आतापासून काही महिन्यांनी. हे संक्रमण फार दूरच्या भविष्यात येत आहे हे तुम्हाला माहीत असल्याने, त्यासाठी जमेल तितकी योजना करा आणि तयारी करा. जेव्हा संक्रमणाची वेळ येते तेव्हा असावध स्थितीत असू नका. या संक्रमणावर परिणाम करणाऱ्या सर्व मुद्द्यांचा विचार करा आणि चांगली तयारी करा.

## तुम्ही ज्या हंगामात आहात त्याचा आनंद घ्या

आयुष्यातील प्रत्येक ऋतूचा आनंद घ्यायला शिकले पाहिजे. जीवनातील काही ऋतू इतरांसारखे आनंददायी नसतात. तरीही, तुम्ही प्रवासाचा आनंद घ्यायला शिकले पाहिजे कारण प्रत्येक ऋतूचे मूल्य असते.

## *'कैरोस'* क्षण केव्हा घडतो?

पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे, *'कैरोस'* क्षण आमच्या जीवनांत काही विशिष्ट घटनांचे एकत्र येणे होय ज्याद्वारे ती योग्य संधी ठरते. वैय्यक्तिक

बाबींत, *'कैरोस'* क्षण देवापेक्षा आमच्यावर अधिक अवलंबून आहे. उदाहरणार्थ, आपल्या उद्योगाची अथवा आपल्या सेवाकार्याची सुरूवात करण्यासाठी आपण *'कैरोस'* क्षणाची वाट पाहत असाल. आपल्या सेवेची सुरूवात करण्याची वाट पाहणाऱ्या व्यक्तीसाठी, *'कैरोस'* क्षण त्यावेळी येईल जेव्हा देव पाहतो की ही व्यक्ती तयार झाली आहे. ही तयारी या गोष्टीवर अवलंबून आहे की त्याच्या जीवनात देवाच्या व्यवहारास तो कसा प्रतिसाद देतो. त्याच्याठायी इच्छित चारित्र्य, शुद्ध हेतू, योग्य प्रवृत्ती, आणि सेवकाच्या हृदयाचा विकास होत नाही तोवर देव वाट पाहील. जेव्हा देव यांना त्याच्याठायी परिपक्व होतांना पाहतो, तेव्हा त्याच्या सेवेचा आरंभ करण्याचा *'कैरोस'* क्षण येतो. तोवर, देव आवश्यक तोवर वाट पाहील. देव कधीही घाईत नसतो.

# 5
# वेळेचे पुनर्स्थापन

**योएल 2:25**
**मी तुमच्यावर पाठवलेले आपले महासैन्य म्हणजे झुंडींनी येणारे टोळ, चाटून खाणारे टोळ, अधाशी टोळ व कुरतडणारे टोळ ह्यांनी ज्या वर्षांचे उत्पन्न खाल्ले त्यांची तुम्हांला भरपाई करून देईन.**

**स्तोत्रसंहिता 103:5**
**तो तुझे आयुष्य उत्तम पदार्थांनी तृप्त करतो; म्हणून तुझे तारुण्य गरुडासारखे नवे होते.**

**2 पेत्र 3:8**
**तरी प्रियजनहो, ही एक गोष्ट तुम्ही विसरू नका की, प्रभूला एक दिवस हजार वर्षांसारखा आहे आणि 'हजार वर्षे' एका 'दिवसासारखी' आहेत.**

शेवटी, आम्ही वेळेचे पुनर्स्थापन करण्याबद्दल काही विधाने करू. आम्ही अशा काळात जगत आहोत ज्याविषयी बहुतेक बायबल विद्वान मानतात की हा पुनर्स्थापनेचा काळ आहे, ज्याबद्दल प्रेषितांची कृत्ये 3:19-21 मध्ये सांगितले आहे. मंडळीत हे पूर्ण होत आहे कारण तिला मोठे गौरव व सामर्थ्य पुन्हा लाभत आहे. तथापि, आपण पवित्र शास्त्रात पाहतो, जेव्हा जेव्हा देव पुनर्स्थापन करतो तेव्हा तो वाढीस आणतो (ईयोब 42:10). देव जे पुनर्स्थापित करतो ते पूर्वीपेक्षा खूप मोठे आणि चांगले बनते. हे काळाच्या दृष्टीनेही खरे आहे. वेळेचे देवावर नियंत्रण नाही, परंतु देव वेळेवर नियंत्रण ठेवतो. देवाच्या घड्याळात, वेळ आपल्या सवयीपेक्षा वेगळ्या पद्धतीने चालतो. आपल्यापैकी काही लोकांसाठी, टोळांनी आपले जीवन त्रस्त केले असावे. या संदर्भात, टोळ ओसाड, विनाश आणि निष्फळपणाचे प्रतीक आहे. देव वाया गेलेली वर्षे (वेळ) पुनर्स्थापित करू शकतो (कारण काहीही असो). जे

आपण आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी सहस्राब्दीमध्ये कधीही साध्य करू शकणार नाही ते तो आपल्याला त्याच्या आत्म्याद्वारे एका वर्षात पूर्ण करण्यास सक्षम करू शकतो. आपल्या जीवनात वाया गेलेला वेळ परत मिळवण्यासाठी आपण देवाकडे पाहू शकतो.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्क होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्कता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवाः*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.


**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

देवाजवळ जगाच्या स्थापनेपासून, किंवा कदाचित मागे अनंतकाळापासून—अज्ञात काळापासून ते वर्तमान समयापर्यंत एक घड्याळ टिकटिक करीत आहे या वस्तुस्थितीचा विचार करणे तुम्ही कधी थांबवले आहे का? तुम्हाला हे माहीत आहे का की देवाजवळ तुमच्या वैयक्तिक जीवनासाठी एक घड्याळ आहे? तुम्ही कधी तुमच्या मनगटावरील घड्याळाप्रमाणे अथवा भिंतीवरील घड्याळाप्रमाणे नव्हे तर देवाच्या घड्याळाप्रमाणे तुमचे जीवन सुव्यवस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे का किंवा तशी इच्छा धरली आहे का? तुमच्यासाठी हे किती महत्त्वाचे आहे की तुम्ही देवाच्या वेळेनुसार सर्वकाही करावे—की तुम्ही तुमच्या जीवनात कोणत्याही क्षणी त्याला जे हवे आहे अगदी तेच करत आहात, आणि हे की तुमच्या जीवनाच्या ठरविलेल्या वेळी तुम्ही जे व्हावे असे त्याला वाटते तसे तुम्ही बनावे?

हे आव्हानात्मक प्रश्न आहेत, आणि हे महत्वाचे आहे की आपण देवाचे घड्याळ जाणून घ्यावे आणि देवाच्या घड्याळानुसार आपले जीवन क्रमबद्ध करावयास शिकावे. हे पुस्तक व्यक्ती म्हणून आपल्यासाठी देवाची वेळ ओळखण्यास आणि समजून घेण्यास शिकण्यात आपली मदत करेल.

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org